**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६७ दिनांक १४/११/२०२४**

# तंबाखूजन्य पदार्थाची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने दि.१३/११/२०२४ रोजी पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/व्हटकर, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोहवा/कपिल नेमाडे, पोहवा/संजय धांगडा, पोशि/संदिप राजगुरे यांचे पथक हे मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर गस्त करत असताना १९.४० वाजताचे दरम्यान तलासरी पोलीस ठाणे हद्दित मौजे दापचरी ठाकरपाडा येथील मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत मुंबईच्या दिशेने असलेल्या सर्विस रोडवर ता. तलासरी, जि. पालघर येथे आले असता त्यांना एक अशोक लेलॅण्ड कंपनीचा टेम्पो क्रमांक MH-01-CV-6680 हा संशयीतरित्या उभा असल्याचे दिसल्याने सदर टेम्पोस चेक केले असता सदर टेम्पोमध्ये इतर मालासोबत महाराष्ट्र शासनाने अधिसुचनाद्वारे महाराष्ट्र राज्यात सुगंधी सुपारी व पान मसाला हा वाहतुकीस/विक्रीस/साठा करण्यास प्रतिबंध केलेला SHK कंपनीचा सुगंधी सुपारी व पान मसाला असा १३९ किलोग्रॅम वजनाचा एकूण १५,६६,०००/- रुपये किंमतीचा अवैधरित्या तंबाखूजन्य पदार्थ वाहतुक करत असताना मिळून आल्याने सदर टेम्पोवरील चालक नामे तौफिक खान वय २३ वर्षे रा.ग्राम नटौली, पोस्ट नंदौली, नरसडा, सुल्तानपुर बाजार, बल्दीराय, राज्य- उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१) १५,६६,०००/- रुपये किंमतीच्या पिवळ्या रंगाच्या २० मोठ्या गोण्या, एका गोणीमध्ये सफेद रंगाच्या ६ छोट्या गोणी, एका छोट्या गोणीमध्ये SHK असे लिहिलेले ५८ पॅकेट,एका पॅकेटची किंमत २२५ रुपये.
२) १०,००,०००/- रुपये किंमतीचा एक अशोक लेलॅण्ड १४१२ कंपनीचा टेम्पो.

असा एकुण किंमत २५,६६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपीविरुध्द तलासरी पोलीस ठाणे येथे I २३२/२०२४ भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम १२३,२२३,२७४, २७५,३(५) सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमने २०११ चे कलम २६(२), २७,(२) ई,२६ (२) (अे),३० (२) (अे) सहवाचन मा.अन्न सुरक्षा आयुक्त महाराष्ट्र राज्य अधिसुचना अ.सु. म.अ./अधिसुचना/५८१/२०२४/७दि.१२/०७/२०२४ regulation no 2,3,4 of food safety & sätandards (prohibition and restrictions on sales) Regulation 2011, सहवाचन regulation no.3,1,7 of food safety&standards (food products standards and food additives) Regulation 2011 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून वरील आरोपीत चालक यास अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास हा पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा पालघर हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/प्रदिप पाटील, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, सपोनि/व्हटकर, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोहवा/कपिल नेमाडे, पोहवा/संजय धांगडा, पोशि/संदिप राजगुरे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी पार पाडलेली आहे.